
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# वसंत आबाजी डहाके यांच्या प्रेम कविता




प्रा.डॉ.सुधीर भगत
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, भगवंतराव विज्ञान महाविद्यालय एटापल्ली जि.गडचिरोली.

वसंत डहाके यांनी आपल्या प्रेमाचे मनोज्ञ दर्शन कवितेतून घडविले आहे. त्यांच्या प्रेमकवितेमध्ये असलेला वेगळेपणा प्रकर्षाने आपल्याला जाणवतो. प्रेमकवितेला स्वतःचे असे निश्चित वेगळे रूप आहे.वेगळे आणि उत्कट प्रेमानुभव कवितेत व्यक्त झाले आहेत.प्रेमकाव्यामध्ये त्यांच्या पत्नीवर केलेले काव्य दिसून येते त्यांच्या पत्नीवर केलेल्या कवितातून समाधानाची भावना दिसून येते.प्रमाचा ओलावा कवी कोठे मिळतो ? ते विसाव्याचे ठिकाण ,विश्रामगृह कोणते ? तर त्यांची पत्नी म्हणूनच ' योगभ्रष्ट 'हा पहिला कवितासंग्रहच त्यांनी आपल्या पत्नीला अर्पण केला आहे.' योगभ्रष्ट ' या कवितासंग्रहात ' किनारे ' या कवितेपासून पुढच्या बऱ्याच कवितांमध्ये स्त्रीविषयक कवितयीची एक ओढ व्यक्त झालेली दिसून येते.ही ओढ ,आकर्षण दुहेरी म्हणजे शारिरिक तसेच मानसिक स्वरूपाचे दिसून येते.

" लाटेवर तरंगत आहे माझा लाकडी चेहरा,
त्वचेंतून बाहेर येतोय पांढरा फेस आणि शेवाळ
या अमर्याद समुद्रावरील वेदनेचा तवंग
आणि तेलकट मरणाचा गाळ. "

(योगभ्रष्ट पृ.३३)

कवीच्या वाटयाला वाईट जीवन आले,हाल अपेष्टा वाटयाला आल्या आणि दु:खमय जीवन त्यांच्या वाटयाला आले.या दु:खमय जगात या अंधारात ' स्त्री ' हाच एक आशेचा किरण होता.ही जाणीव त्यांना भोवतीच्या अमर्याद समुद्रावर पसरलेल्या मरणाच्या तेलकट गाळ बघत असताना हाते हे विशेष. ' माझे हात मध्येच थकले तर ,किनारे जवळ कसे येतील ', याने ते चिंताग्रस्त आहेत.

" तुझंमाझं एक सूर्यफूल.
एखाद्या सूर्यफुलाप्रमाणं आपलं आयुष्य,
सूर्यस्तोत्र होऊन जावं.
तुझा हात आहे माझ्या हातांत,
आता ही वाट जड जाणार नाही,
हा अनादीअनंत नाही,
आणि आपण दोघंच
हात गुंफलेले."

(योगभ्रष्ट पृ.५३)

एक मेकांची साथ एकमेकांना असेल तर जगातील कोणतीही गोष्ट अशक्य नाही.या दु:खमय जगात आपण दोघे कांत ३ कांता रेतीसारखे होतील हा फार मोठा आशावाद व्यक्त करणारी ही कविता आहे.निराशवादी ,दु:खमय आणि भाम्रक जगात ' आज पुन्हा सूर्यफुलासारखा तुझ्यासारखा कोमल वाटतो आहे ' पत्नीची साथ ही जीवनात नवा फुलोरा फुलविणारी आहे. डहाके यांच्या प्रेमविष्कारातील वेगळेपणा सहजच जाणवतो, त्यांनी आपल्या पत्नीवर प्रेम केले आहे.या जगामध्ये आपण एकाकी आहोत पण तुझी साथ मला असेल तर हा मार्ग कठीण नाही.दोघांच्याही सहकार्यातुन ,एकजुटीतून आपला संसार फुलेल आनंदाचा होईल हा आशावाद कवीने व्यक्त केला आहे.

तुझ्या ओंजळीत देतों,मांडयात खुपसतो,
तेव्हा तूं दु:ख वेचतेस हळुवार स्पर्शानं,
जशी तुझ्या आवडीची फुलं तूं वेचावींस.
तसे तुझे नुस्ते साधेच हात
मी हातांत घेऊन पाहत राहतो."

(योगभ्रष्ट पृ.६२)

दु:खाच्या समुद्रात एकाकी असलेल्या कवीला पत्नीच जीवनाचा आधार वाटते.दु:खात एकाकीपणात तिच्या आधारासाठी मन व्याकुळ होताना दिसते. पत्नी हीच आपला खरा आधार आहे.अंधारमय जीवनात ती प्रकाशकिरण आहे.त्यामुळे पत्नीच्या प्रेमात कवीचे मन गुंतलेले दिसते.त्यामुळेच तिच्यात प्रेमाच्या तृप्तीचे समाधान त्यांना मिळते.या प्रेमामुळे त्यांची कविता ओथबूंन निघाली आहे.

" तूं आहेस एक अपार्थिव झाड
माझ्याआंत सतत वाढत जाणारं.
माझ्या रक्तवाहिन्यांतून तुझ्या फांद्या.
मी ऐकतो आंतआंत
तुझ्या पानांची सळसळ."

(योगभ्रष्ट पृ.६७)

प्रेमकवितेचे एक वेगळे रूप येथे कवीने साकारले आहे.तू आणि मी वेगळे नाही तर एकच आहोत अशी प्रेमामधील अव्दैताची भावना व्यक्त केली आहे.तुझ्या स्पर्शाने ताजेतवाने झाल्यासारखे - उजळून निघाल्यासारखे वाटते,दु:ख यातना एकटेपणा नष्ट होऊन तुझ्या स्पर्शाने माझे जीवन सुखी आनंदी व सुसह्य होते.एकाकी असणाऱ्या कवीला पत्नीचा फार मोठा आधार वाटतो.तिच्यामुळेच आपल्यामध्ये सामर्थ्य निर्माण होते असे कवीला वाटते. योगभ्रष्ट 'या कवितासंग्रहातील इतर कवितांमधून जे जग व्यक्त झालेले आहे.त्या तुलनेने ही सोबतीची आणि आधाराची व्याकूळ झालेली आपल्याला दिसते.पण पराकोटीच्या एकाकीपणातून कवीच्या मनात विविध भावछटा निर्माण होताना तिचा आपल्याला आधार आहे असे वाटणे व ती आपल्या सोबत आहे,तिचा आपल्याला आधार आहे असे वाटणे व ती आपल्या सोबत नाही अशीही भावना निर्माण होणे अश्या वेगवेगळ्या भावना प्रेमकवितेत व्यक्त होताना दिसते.

" तू चालतेस माझ्यासमवेत
कोमल स्वप्नाप्रमाणे '.
'असल्यास क्षणी,
हवे असताच तुझे हात '.
'आपल्या किरट्या पायांना,
नसतो आधार कशाचाही."

(योगभ्रष्ट पृ.४९,पृ.४१)

प्रेमकवितेत ' हात ' ही प्रतिमा वारंवार येताना दिसते त्याक्षणी ' हवे असतात तुझे हात ' 'तुझा हात आहे माझ्या हातात ' , ' तसे तुझे नुस्ते साधेच हात ' , हात ही संकल्पना व्यवहारात आपण आधार या अर्थाने वापरतो.तुझा हात सोबत असेल तर मला म कशाचीही गरज नाही वैगेरे.याच जाणिवेने ही प्रतिमा वारंवार कवितेत येताना दिसते. ' स्पर्श ' ही कविता तर हात विषयकच आहे. कवी स्वत:च या प्रतिमेबाबत म्हणतात, "हात ही मानवी संबंधाची प्रतिमा आहे.दोन व्यक्तींमधले नाते ,परस्परांशी संवाद , एकमेंकाच्या संदर्भान येणारे अस्तित्वभान हे सारेच ' हात' ही या प्रतिमेतुन व्यक्त होते."दोघेही पती पत्नी एकमेंकांच्या सुखदु:खामध्ये सहभागी होऊन संघर्षमय जीवनात स्वत:ला शोधनाच्या प्रयत्न करतात.कवी पत्नीच्या प्रेमामध्ये स्वत:ला अपर्ण करून टाकतात. कवी स्त्रीकडे प्रेयसी किंवा पत्नी म्हणून केवळ पाहत नाही तर सोबती म्हणून पाहतो," कवी स्त्रीकडे एक व्यक्ती म्हणून पाहतो दोघेळी एका विशिष्ट समाजव्यवस्थेत ,सांस्कृतीक संचितासह जगत असतात.त्यांच्या भावती विशिष्ट राजकिय, सामाजिक , आर्थिक स्थिती असते.मानवी जीवनाच्या संदर्भातील प्रश्नांसंबधी चर्चा असतात.संघर्ष असतो.यात ती दोघेही कुठेतरी असतात.सोबतीने परस्परांच्या अवकाशात ती एकमेंकांना अर्थपूर्ण करतात.एकमेंकांच्या मध्ये आधारभूमी शोधतात." योगभ्रष्ट मधील कविता या आधारभूमीचा आहे.

' योगभगष्ट ' मधील स्त्री बिनचेहऱ्याची आहे.तिच्या शरिराचे अवयवाचे वर्णन कवी करित नाही.त्यामुळे तिचे कोणत्याही प्रकारचे व्यक्तिमत्व कवितेतून व्यक्त होताना दिसत नाही.

' शुभवर्तमान ' मध्ये प्रेमानुभव व्यक्त करणाऱ्या विपुल कविता आहेत. ' नि:शब्द ' (पृ.27) , ' दोर ' (पृ.28) , ' संध्याकाळी समुद्रावर ' (पृ.40) , 'समुद्र अचानक ' (पृ.41) , ' मी डोकं टेकतो ' (पृ.43) , ' तू आहेस जमीन ' (पृ.43) , ' हंस गात आहेत ' (पृ.44) , ' तु माझ्या कपाळावर ' (पृ.27) , ' झाडानं अंग काढून घेतल ' (पृ.57) , ' प्रदेश ' (पृ.60) , इ. अनेक कवितांमध्ये प्रेमकवितेचे एक नवे रूप साकारले दिसते.

" मरणाच्या इच्छेने पच्छाडलेल्या या वर्तमानात
मी तुला म्हणतो की माझं तुझ्यावर प्रेम आहे,
तेव्हा ते शब्द किती निरर्थक असतात.
एखादा अवाढव्य दगड वरून कोसळतो आहे,
हे दिसत असताना."

(शुभवर्तमान.पृ.28)

प्रत्येक माणूस एकाकी आहे व इतरांनी तो एकाकी करीत असतो. अश्या खिन्न, निराश वर्तमानकाळात मी तुझ्यावर प्रेम व्यक्त करणे म्हणजे अर्थहीन आहे.कवीचा पत्नीकडे पाहण्याचा दृष्टीकोन यातून व्यक्त होतो.पत्नीविषयीच्या उत्कट प्रेमाची प्रचिती जाणवते.सगळीकडे वैफल्यग्रस्त जीवन असताना हे वैफल्य, दु:ख घालविण्याचे एकमेव केंद्र कोणते असेल तर ते म्हणजे पत्नी होय.' मी तुझ ाा हात हातात घेतो आणि मोकळे करतो माझे तुझे श्वास 'असे ते म्हणतात.

" मी डोकं टेकतो
ती उशी तूं असतेस
आणि माझ्या हातांतलं पुस्तक
तू असतेस
बाहेरचा ओला अंधार
आणि माझ्या खोलीतील मंद स्वरांतली गाणी
तूं असतेस."

(शुभवर्तमान.पृ.43)

जगामधील उदासीनता, वैफल्य , यातना , एकटेपणा हे बाह्य जगताचे भान विसरून डहाके यांची कविता प्रीतीमय झाली आहे.पत्नीमुळे कोणकोणत्या माध्यमातुन दु:ख कमी होते ? पत्नी म्हणजे डोकं टेकतो ती उशी,' हातातल पुस्तक ', ' ओला अंधार ' , ' मंद ङ ावरातली गाणी ' , ' शांत उजेड ' , ' वाऱ्याची झुळूक ' , ' पापण्यांवर टेकलेली झोप ' ,  तंतुवाद्य तू  इत्यादी. ह्या सर्व बाबी जीवनाला सुखद करीत असतात.आनंद देत असतात अतिशय उत्कृष्ट नवीन आपण आध्याच प्रतिमातुन मोठा प्रेमाचा आविष्कार कवीने व्यक्त केला आहे.

" मन त्रासलेलं पोळलेलं कुत्रं जसं
इथं लोळतं,तिथं लोळतं,
तसा मी तुझ्या डाव्या कुशीत येतो,उजव्या.
डोकं खुपसतो,तुझ्या छातीत मांड्यात
पडून राहतो शेजारी, उठतो ,पुन्हा येतो
तुझा स्पर्श शोधत."

(शुभवर्तमान.पृ.60)

" तूं म्हणालीस : हा समुद्र आहे ना
तसा तूं वाजत असतोस सतत
माझ्या मनांत
समुद्र जो दूर होता
जवळ कधी आला , कळलं नाही ."

(शुभवर्तमान.पृ.41)

कवी व पत्नीचे संबंध हे मोठया प्रेमाने बांधलेले आहेत.पत्नीवर प्रेम करताना शरीराला झालेले दु:ख , आलेले वैफल्य पत्नीमुळे तिच्या प्रेमामुळे नष्ट होते म्हणून पत्नीला जमीनीची उपमा देऊन तू झोप डोळ्याची शांती ,ताणलेल्या नसांसाठी कोवळा स्पर्श , थंड काळोख भिजवलेलं मऊ कापड , पातळ पांघरूण ,जिभेचा शब्द मुरलीचा स्वर इ.आहे म्हणून ' मला तुझ्यात पुरून टाक 'असे कवी म्हणतात.अरूणा ढेरे म्हणतात, " सखी किंवा सखा सुखदु:खातली सहभागी आणि एकाकी संघर्षमय जीवनात भेटलेला समानधर्मी म्हणून या कवितेतले प्रेमिक एक दुसऱ्याला भेटतात ,शोधतात.स्वत:ता दुसऱ्यामधून पूर्ण करण्याचा ध्यास घेतात.प्रेमातली अव्दैताची भावना विलक्षण आनंददायी खरी : पण ती फार दुर्मीळ आणि भंगुरतेने वेढलेली.एरवी व्दैताची अटळ असह्य जाणीव हेच संवेदनशिल प्रेमिकांचे भागधेय. या व्दैताचा शोध हाही ठसठशीत विशेष आहे."प्रेमातील अव्दैताची भावना कवीने व्यक्त केली आहे.पण दु:खाची किनार तिला आहे.दोघेही एकाकी, संघर्षमय , दुख:मय जीवनात भेटतात.एकमेकात शोधण्याचा प्रयत्न करतात हा शोधच ह्या प्रेमकवितेचा विशेष आहे.कवीला स्त्रीच्या शारिरिक

आकर्षणापेक्षा तिच्या सोबतीची ,आधाराची जास्त गरज वाटते.त्यामुळे त्यानी प्रेमकवितेत स्त्रीकडे प्रेयसी, पत्नी म्हणून न पाहता एक व्यक्ती म्हणून पाहतो. ही व्यक्ती आपली सोबत करणार आहे,आपल्या जीवनाला आधार देणार आहे.अश्या भावनेने कवी पाहतो. 'शुन:शेप 'हा तिसरा कवितासंग्रह ! यामध्ये सुध्दा नवे सामर्थ घेऊन प्रमकविता येताना दिसते.या कति`त प्रेमसंवेदनेला महत्ववाचे स्थान आहे.

" आभाळ गुणगुणतंय
निळ्या पाखरांसाठी
पाखरू गुणगुणतंय
नितळ निर्झरासाठी
मी तुझ्यासाठी ."

प्रेमभावना व्यक्त करणारी ही अपूर्व कविता आहे.प्रत्येकाला कोणाची तरी साथ हवी असते त्यासाठी ते आपल्या पध्दतीने प्रयत्न करतात.आभाळाला पाखरांची ,पाखराला स्वच्छ वाहणाऱ्या झऱ्याची ,दुपारच्या उन्हाला हिरव्या गवताची, गवताला हळुवार वाऱ्याची साथ हवी असते.मला मात्र तुझी साथ हवी आहे. ती मिळाली की, नवा उत्साह माझ्यामध्ये निर्माण होतो. 'तुझं मन गुणगुणतंय माझ्यासाठी, मी तुझ यासाठी 'असे दोघांचे संबंध एकमेकात आस्थेने ,प्रेमाने बांधलेले दिसतात.पत्नीच्या प्रेमाचे ,केवळ स्पर्शाचे प्रंचड सामर्थ्य कवीला जाणवते ' तुझ्या बोटातल्या उन्हाचा स्पर्श , माझ्या बोटांना ' तुझ्या त्या बोटातील शरीरातील स्पर्शाची जाणीव माझ्या संपूर्ण रक्तवाहिन्यात हाते ते प्रेमाचे वारे तू माझ्यासाठी ही प्रेमाची भावना अतिशय  समर्थपणे वेगवेगळ्या प्रतिमांच्या व्दारे कवीने व्यक्त केली आहे.

" नदीच्या पाण्यावर
सकाळच कोवळ ऊन पडावं
संध्याकाळच्या उजेडात
गळयातल्या घंटा वाजवत
गुरं पाणी प्यायला यावीत
तशा तुझ्या आठवणी
माझ्या मनात."

(शुन:शेप. पृ.12)

पत्नी प्रेमाच्या आठवणीचे पक्षी कवींच्या घरटे तयार करतात व ते जसे एक एक बाहेर निघतात तसे कवी पत्नीच्या आढवणीने सुध्दा समाधानी होतात.सकाळचे पाण्यावर पडलेले ऊन कितीही दु:खी माणसाला समाधान ,आनंद देते त्याप्रमाणे कवीलाही आनंद मिळतो सतत पत्नीच्या प्रेमाची आठवण कवी करीत असतो केवळ आठवणीने सुध्दा कवीचे प्रेमाने ह्दय भरून येते.कवींला पत्नीची आठवण झाली . ती आठवण तो विचार कवींच्या मनात कश्या स्वरूपाचा आहे ? तर ' सकाळच कोवळ ऊन ' ,' एकच शुभ्र पक्षी ', केवळ पत्नी प्रेमाच्या आठवणीचाच विचार मनात येतो हे एकच शुभ्र पक्षी हे प्रतीक निर्देशनास आणते. 'गुरांच्या गळयातील घंट्यांचे निनाद ' , रात्रीच्या शांत वेळेला वाहत्या पाण्याच्या आवाज ' , इ.विचार आणि आठवणी त्याच्या मनात येतात या विचारांनी त्याला समाधान वाटते. पती - पत्नी प्रियकर - प्रेयसी यांच्यामध्ये अचानक निर्माण झालेला दुरावा त्यांना अतिशय दु:ख देणारा वाटतो.पत्नीच्या स्पर्शाने सुखी होणारे , तिच्या केवळ आठवणीने आनंदी होणारी कवी यांच्यामध्ये अचानक दुरावा निर्माण व्हावा आणि तो कोणीतरी निर्माण करावा यामुळे ते अस्वस्थ होतात.

"अचानक तुझ्यामाझ्यामध्ये
उगवतो हा चेहरा
झडलेल्या नाकडोळयांचा
आणि मी भिऊन जातो.
कोणाचा असतो हा चेहरा
तुझ्या माझ्यात अंतराय पाडणारा
मी त्याला विसरू इच्छितो
जेव्हा मी तुझे हात हाती घेतो
तेव्हा तुला माझे थरथरनारे पंजे
जाणवत नाहीत ? "

(शुन:शेप. पृ.21)

अचानक कोणीतरी तुझ्या माझ्या मध्ये दुरावा निर्माण व्हावा यासाठी कटकारस्थान करीत आहेत असे कवीला वाटते.या कटकारस्थानाची अतिशय भयानकता जाणवते 'झडलेल्या नाकडोळ्यांना विकृत वाटतो ते या प्रसंगाने हादरून जातात.एकमेंकांचे हात हातात घेतल्यावर ' तेव्हा तुला माझे थरथरणारे पंजे ,जाणवत नाहीत ?' यावरून त्यांच्या मनामध्ये निर्माण झालेल्या प्रचंड दुराव्याच्या भावनेची जाणीव होते.त्यामुळेच वास्तव जगाबद्दल कवी कमालीची दु:खी होतो.माणसामध्ये साध्या माणुसकीचा सुध्दा प्रत्यय कवीला येत नाही.त्यामुळे कवीने बऱ्याच कवितात एका वेगळया जगाची कल्पना मांडलेली दिसते.वास्तव जगामध्ये जे दु:ख, निराशा,एकाकीपणा आहे त्यातून कुठेतरी चांगले असेल,माणूसकी असेल यातून ही भावना येत असावी.

" पलीकडे जगात तू असशील ?
भेटशील ?
आपण भेटलो की
हातात हात घेशील ?
(शुन:शेप. पृ.22)

जीवनात संघर्ष करण्यासाठी पत्नीची साथ हवी असे कवीला वाटते.दोघेही एकमेंकांच्या आसऱ्याची प्रेमाची ठिकाणी आहेत.तिच्या प्रेमाची किमंतच कवीला फार मोठी कमाई वाटते.त्यामुळे अनेक कवितातून केवळ आठवणीने सुध्दा कवीचे मन मोहरून जाते.पण अनेक वेळेला या प्रेमाला उदासीनतेची झाक असल्याचे दिसते.प्रेमाला दु:खाची किनार दिसते पण दुख:चे ,एकाकीपणाचे धागेदोरे पत्नी या केंद्राजवळ एकत्र येताना दिसतात.

' योगभ्रष्ट ' मध्ये ' तुझे हात माझे हात झाले तरी ' , ' असं एकदम एकाकी वाटतं ' हा प्रश्न कवीला पडला असताना पुन्हा ' शुभवर्तमान ' मध्ये नव्याने पडलेला तोच प्रश्न आहे या संग्रहामध्ये ' सोबत ' या तीन भागातल्या कवितेच्या दुसऱ्या भागात सोबतीचे एक वेगळे परिणाम व्यक्त झाले आहे ते म्हणतात, ' आपण एकमेंकांच्या जवळ असुनही किती एकाकी आहोत' पुढे ते म्हणतात, ' एकत्र येण्यातच एकाकी होण्याची बीज असतील का ' ,एकात्मता हा मानसिक अनुभव तर पृथकता ही वास्तविकता हा अनुभुतीचा प्रत्यय कवीला येत असावा.शरीराने व्यक्ती एकत्र असल्या तरी मनाने त्या एकाकीच असतात ' 'मनुष्य शरीराची मर्यादा ओलांडू शकत नाही तो आपल्या स्वत:च्या अस्तित्वतेबाबत अडकून पडलेला असतो ' ,असे कवीला सुचवायचे आहे म्हणजे शारिरिक आकर्षण ,लैंगिकता, आत्मियता यांच्या पलीकडे काहीतरी आहे ते म्हणजे कवींचे एकाकीपण. ते सतत कायम आहे.त्या एकाकीपणातून ज्

" मी स्वत:ला आता
तुझ्यात सोपवतो
तू मला संपव
विझव माझं अस्तिव..."
(शुन:शेप. पृ.)

" तर तू या कवितेतील पुढील ओळी.
तू आहेस भूक
आणि तू आहेस माझं अन्न,
तू आहेस
माझं भस्म,माझी राख,माझा अंगारा."

स्त्री पुरूष हे एकमेंकाचे आकर्षण आहे पण केवळ दोघेही एकमेंकांचे वस्तू नाहीत तर तो एकमेंकाचा आधार आहे.

" आणि माझे विफल तळहात
असह्य फडफडतात'
वळतो निघून जातो.
पुन्हा परत येतो."

मी पुन्हा पुन्हा परत येतो तुझ्याकडे 'ही पुन्हा पुन्हा आधाराची गरत कवीला भासते आहे.हात ही प्रतिमा शृन:शेप या कवितासंग्रहातही अनेक वेळा येताना दिसते.ती प्रेमभावना व्यक्त करीत येते पण सोबत साथ हाच या प्रतिमेची स्थायी भाव असल्याचे जाणवते.

" जेव्हा मी तुझे हात हाती घेतो
तेव्हा मला माझे थरथ्रनारे पंजे
जाणवत नाहीत ? "

(शुन:शेप. पृ.21)

हात या प्रतिमेचा वेगवेगळया भावना व्यक्त करण्यासाठी कवींनी उपयोग केलेला आहे.

" आपण भेटलो की
हातात हात घेशील ?
किंवा हातातले हात सुटत असेल. "

(शुन:शेप. पृ.22)

शेवटी कवी आपल्या प्रत्नीचा प्रयसीचा हात घट्ट पकडतो व ' मी वळतो तुझा हात हातात घेऊन ' असे म्हणतो. (शुन:शेप. पृ.29) प्रेम हे कधीच तुटू नये तर ते रेशमाच्या धाग्यासारखे अधिक घट्ट व्हावे मजबूत व्हावे असे कवीला वाटते.

वंसत डहाके यांचा चौथा कवितासंग्रह म्हणजे ' चित्रलिपी '! तिन्ही कवितासंग्रहामध्ये जी प्रेमाची भावना कवीने व्यक्त केली आहे. त्याचप्रमाणे या कविता संग्रहातही प्रेमाची विविध रूपे त्यांनी व्यक्त केली आहेत.अस्तित्ववादी विचारातून तिचा आविष्कार होत असल्यामुळे तिच्यात एक वेगळेपणा आपल्याला जाणवतो. ' जिकडे पाहाव तिकडे, . ( चित्रलिपी. पृ.17) ' मी तुलाच शोधत होतो ' ( चित्रलिपी. पृ.58) , ' अन्नपुर्णा ' , ( चित्रलिपी. पृ.60), ' वानप्रस्थ ', ( चित्रलिपी. पृ.67) , ' सांभाडणारे हात ' , ( चित्रलिपी. पृ.63), ' उरण ' , ( चित्रलिपी. पृ.68), इ.अनेक कवितांमधून कवीने प्रेममय भावना व्यक्त केला आहे.

" जिकडे पाहावं तिकडे तुझाच चेहरा नजरेसमोर येत राहतो
उंच इमारतीवर, समुद्राच्या लाटांवर,रस्त्यावर,झोपड्यांवर
यातनांचा मोर येत राहतो.
विझलेल्या वेड्यांचा गल्लीबोळात काही उरलंसुरलं
शोधणाऱ्या हडकुळ्या कुत्र्याप्रमाणे
माझं मन शोधत राहतं तुझं असणं.मी पुन्हा पुन्हा
तुझ्या अस्तित्वाचा माग घेत राहतो. "

कवीच्या प्रत्येक प्रेम कवितेला दु:खाचीच किनार दिसते.अस्तित्ववादी विचारांचे ते फार मोठे वैशिष्ट्य आहे.त्यामुळे अतिशय चपलखपणे तो विचार व प्रेमाची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.त्यांच्या एकुण प्रेमकवितेत स्त्री ही आपला एकमेव आधार आहे. या दु:खमय , यातनामय जगात स्त्री अथवा प्रत्नी याशिवाय जगात दुसरा आधार नाही. त्यामुळे सर्वच ठिकाणीसमुद्रकिनारी इमारतीवर ते शोध घेतात. तो कसा ? तर ' विझलेल्या खेड्यांच्या गल्लीबोळात काही उरलंसुरल शोधणाऱ्या हडकुळ्या कुत्र्याप्रमाणे ' ( चित्रलिपी. पृ.17). व स्वत:च्या अस्तित्वाचा शोध घेतात.

' मी तुलाच शोधत होतो ' मध्ये तर कवी पत्नी प्रेयसीच्या शोधात आहे पूर्वीच्या कवितेत ' जिकडे पाहावं तिकडे तुझाच चेहरा नजरेसमोर येत राहतो '( चित्रलिपी. पृ.17) इमारतीवर , समुद्रावर , रस्त्यावर दिसनारा हा चेहरा. येथे मात्रा तिच्या अस्तित्वाच्या शोधात कवी निघाला आहे.

" तुझं नाव मला ठाऊक नव्हतं,
पण तू होतीस
माझ्या डोळयांत आणि कपाळात
अणि माझ्या अस्तित्वाच्या घरात
सगळीकडे ये जा करीत :
माझ्या सगळया अंगणात
काटेरी दांते फिरवीत. "

( चित्रलिपी. पृ.58)

कवीचा हा शोध सर्वच ठिकाणी सुरू आहे तापीच्या, गोदावरीच्या, वरदेच्या, नर्मदेच्या काठावर , खाणावळीत , रस्त्यात, केशवसुतांच्या ' प्रत ' मध्ये , गोविंदाग्रजाच्या निदर्य बालिकेमध्ये , बालकवीच्या 'खिन्न मनाच्या घुमट ' मध्ये , मर्ढेकरांच्या शिशिरागम मध्ये विद्यापिठाच्या ग्रंथालयात ,बैठक कक्षात, चित्रपटगृहामध्ये ,कॅफे फेममध्ये ,आर्वीतल्या गांधी चौकात, हिंगणघाटच्या हॉटेलात , मेंदुच्या वेगवेगळया वाहिन्यात कप्प्यांत,बोळांत ,तळघरात , भुयारात असा शोध सुरू असताना.

" ग्रीष्मातल्या त्या दिवशी
मी ना कवितेत होतो ना जनांत
माझ्या कपाळावर होता
माझ्या आईचा सगळया रेषांचा सुरकुतलेला हात,
बाजुलाच खुर्चीवर बसलेल्या वडलांच्या तुकड्यातुकड्या चेहरा ."
( चित्रलिपी. पृ.59)

या प्रेमकवितेतून स्त्रीच्या विविध रूपाचे एकात्म दर्शन घडते. पत्नी (सहचारीणी) माता,गृहणी , पती पत्नी अशी एकमेंकाना आधार देणारी स्त्रीरूपे दिसतात.त्यामुळे डहाके यांनी मोजक्याच प्रेमकविता लिहिल्या असल्या तरी प्रेमभावनेकडे बघण्याचा त्याचा एक वेगळाच दृष्टीकोन असल्यामुळे त्यांची प्रेमकविता प्रेमभावनेचा एक वेगळाच अनोखा आविष्कार करताना दिसते.म्हणूनच तर पत्नी त्यांना ' अन्नपूर्णा ' वाटते.

वसंत डहाके यांचे व्यक्तिमत्व एक गंभीर अस्तित्ववादी व्यक्तिमत्व असल्यामुळे प्रेमकवितेला एक बाज आलला आहे. चिंतनशिलता व तात्विक असा प्रेमकवितेचा पाया असल्यामुळे ती उघड्यानागड्या लैंगिकतेकडे वळत नाही.प्रेमभावना म्हटले की , कवींच्या मनात लैंगिकतेकडे जातात. पण डहाके याला अपवाद आहेत. लैंगिक आकर्षण अर्थशून्य जीवनाला नवा अर्थ देणारे जरी असले तरी ही कविता शारिरिक पातळीवरच राहते. लैंगिक वासनेत तिमचे रुनपांतर होत नाही. ती प्रणयाची सीमारेषा ओलांडताना दिसत नाही. या प्रेमकवितेत शारिरिकतेपेक्षा मानसिक मिलनाला विशेष महत्व दिदले आहे. त्यामुळे ही कविता विषयवासनेपासून वेगळी होत व उत्कट प्रेमाचा ,तिच्या आधाराचा साक्षात्कार तिच्यापासून समर्थपणे होतो. प्रेमकवितेचे नवस्वरूप त्यांची कविता रेखाटते. आपोआपच प्रेमकवितेला सखोलता प्राप्त हाते. एकुणच त्यांच्या या प्रेमकवितेमध्ये चिंतनशिलता असल्यामुळे तिने समकालीन साठोत्तरी प्रेमकवितेला समृध्द केले आहे आणि एक वेगळे सामर्थ , वेगळे परिणाम प्राप्त करून दिले आहे.

### *निष्कर्ष :-*

1. प्रेमकवितेत पत्नीवर केलेले प्रेम दिसून येते.
2. एकाकी जीवनात पत्नीच ही कविता जीवनाचा आधार वाटते.
3. शारिरिक सुखापेक्षा प्रेमामध्ये मानसिक सुख कवीला जास्त महत्वाचे वाटते.
4. वेगवेगळया भावना प्रेमकवितेत व्यक्त होतानां दिसते.
5. प्रेमकवितेत हात ही प्रतिमा वारंवार येताना दिसते.
6. प्रेमभावनेचा वेगळा आविष्कार करणारी कविता.

### *संदर्भ ग्रंथ :-*

1. वसंत आबाजी डहाके - ' यात्रा ', ' अंतयात्रा ' शब्द प्रकाशन , सातारा 1999.
2. अरूणा ढेरे - ' स्वातंत्र्योत्ता मराठी कविता ' (संपा)सुषमा करोगल,प्रतिमा प्रकाशन पुणे.
३. विजया राजाध्यक्ष - ' कवितारानी ' श्री विद्या प्रकाशन ,पुणे 1999.
४. आशा सावदेकर(संपा.) - ' कविता विदर्भाची ' विदर्भ साहित्य संघ प्रकाशन नागपूर 1999.